**नि. फौ. ख. क्र.२८९/२०१५**

सरकार वि. सविता पाडूळे व इतर.

**नि.क्र.६४**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– वसंत केरबा कदम,</u>**

वय– ५७ वर्षे, नेमणूक–पो.उप.नि., पुणे ग्रामीण,

रा.भिगवण, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. लोहकरे, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.०१/०२/२०१५ रोजी मी इंदापूर पोलीस स्टेशन अंकित बावडा दुरक्षेत्र येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. ठाणे अंमलदार यांनी गु. र. नं.४४/२०१५ दाखल करून तपासकामी माझेकडे दिला. फिर्यादीचे अवलोकन केले. तपासादरम्यान मी घटनास्थळाचा पंचनामा दोन पंचांसमक्ष केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. **<u>घटनास्थळ पंचनाम्यास नि.क्र.६५</u>** देण्यात येते. साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. गुन्हयात वापरलेले हत्याराचा जप्ती पंचनामा केला. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. **<u>जप्ती पंचनाम्यास नि.क्र.६६</u>** देण्यात येते. जप्त मुद्देमालाची पावती फाडली. आता मला सदर मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. **<u>मुद्देमाल पावतीस नि.क्र.६७</u>** देण्यात येते. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले. आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले. आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे. जप्त काठी दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला सदर काठी दाखविली. त्यावर माझी व पंचांची सही आहे. तिला आर्टीकल अ पुर्वीच देण्यात आले आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.एस. एच. खाडे, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. आरोपी व फिर्यादी राहत असलेल्या वस्तीचे नाव पांडूळेवस्ती व भाळेवस्ती

आहे. फिर्यादीच्या घराजवळ २० ते २५ घरांची वस्ती आहे. वस्तीपासून २०० ते ३०० मिटरवर कथीत घटनास्थळ आहे. वस्तीवर करे, भाळे, शिंगाडे, पांडूळे आडनावाचे लोक राहतात. तथाकथीत घटनास्थळाच्या शेजारी महानवर, डोंबाळे, काळे, कांबळे यांची शेती आहे. शेतामध्ये त्यांची घरे आहेत. साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक आहेत. फिर्यादीच्या नातेवाईकांव्यतिरिक्त इतर कोणाचेही जबाब नोंदविले नाहीत. गट नं.५५४ कोणाच्या मालकीचा आहे याचा तपास केला नाही व त्याचा पुरावा दोषारोपपत्रासोबत दाखल केला नाही. पंचनाम्याला जातानाची नोंद स्टेशन डायरीला केली नाही. साक्षीदार सांगतो की, त्याची आवश्यकता नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशनमध्ये बसून पंचनामे केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणताही मुद्देमाल काढून दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटा जप्ती पंचनामा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी व चुकीची मुद्देमाल पावती केली आहे.

**३.** फिर्यादीने त्याच्या जबाबात राहूल भोसले यांचेकडून तुम्ही शेती कशी खरेदी केली हे आरोपी क्र.६ यांनी फिर्यादीच्या दिराला विचारले असे सांगितले नव्हते. तपासात आरोपी व फिर्यादी यांचा दिवाणी वाद असल्याचे निष्पन्न झाले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व फिर्यादीमध्ये दिवाणी दावे प्रलंबित असल्याचे तपासात आढळले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ वर पंचांच्या सहया नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, खोटा तपास करून खोटे दोषारोप पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.१९/०७/२०२५**